विद्यमान एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी निवड करण्यात आलेल्या विमा कंपनीशी झालेल्या सामंजस्य करारनाम्यास मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः निविदा-२०२३/प्र.क्र.२३/आरोग्य-६

गो.ते. रुग्णालय आवार, १० वा मजला,
नवीन मंत्रालय, मुंबई -०१
दिनांक: १० एप्रिल, २०२४

वाचा :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.रागांयो-२०१४/प्र.क्र.२०३/आरोग्य-६, दिनांक १६ सप्टेंबर, २०१६
२) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय,क्र.रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९
३) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय,क्र.निविदा-२०२३/प्र.क्र.२३/आरोग्य-६, दिनांक २१ जून, २०२३
४) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय,क्र.निविदा-२०२३/प्र.क्र.२३/आरोग्य-६, दिनांक ०३ जुलै, २०२३
५) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय,क्र. मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दिनांक २८ जुलै, २०२३
६) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय,क्र.निविदा-२०२३/प्र.क्र.२३/आरोग्य-६, दिनांक १० ऑक्टोबर, २०२३
७) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय,क्र.निविदा-२०२३/प्र.क्र.२३/आरोग्य-६, दिनांक १४ डिसेंबर, २०२३
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांचे पत्र क्र.राआहसो/प्रशा/उव्य/ १०५८५/ २४८७ /२०२३, दिनांक २२.१२.२०२३
९) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय,क्र.निविदा-२०२३/प्र.क्र.२३/आरोग्य-६, दिनांक ०९ जानेवारी, २०२४
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांचे क्र.राआहसो/प्रशा/उव्य/१०५८५/६१६/२०२४,दिनांक ३१.०३.२०२४ चे पत्र.

प्रस्तावना :-

युनायटेड इंडिया इन्शुरन्स या सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनीशी झालेल्या करारनाम्यास संदर्भ क्र. ९ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१.०३.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. वरील संदर्भ क्र. ५ अन्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेचे विस्तारीकरण करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २८.०७.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजना संपुर्णपणे हमी

तत्त्वावर राबविण्याची आवश्यक यंत्रणा उभारण्यासाठी राज्य आरोग्य हमी सोसायटीस काही कालावधी लागेल. सबब, उक्त करारनाम्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी निवड करण्यात आलेल्या युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी सोबत झालेल्या सामंजस्य करारनाम्यास दि.०१.०४.२०२४ ते दि.३०.०६.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर मुदतवाढीच्या कालावधीत एकत्रित महात्मा ज्यातिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थी घटकांसाठी प्रति कुटुंब प्रति वर्ष रुपये १०५०/-(अक्षरी एक हजार पन्नास मात्र) या दराने विमा हप्ता विमा कंपनीस अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. परंतु सदर मुदतवाढ कालावधीत सुधारीत योजना अंमलात आणण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यास करारनामा संपुष्टात आणण्यात येईल.

२. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी व राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई यांच्यामध्ये दिनांक २७.०३.२०२० रोजी झालेल्या सामंजस्य करारातील अटी व शर्ती तसेच वरील संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये नमूद केलेल्या तरतुदी कायम राहतील.

३. सदर शासन निर्णय अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखालील विमा कंपनी निवड समितीच्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२४०४१०१५२७१९०९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY DATTARAM MAHADESHWAR

Digitally signed by SANJAY DATTARAM MAHADESHWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=759d43d3ca03f08520a6d49169531e74206cd390898bbe0690fead8f00f6a3eb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=09A8917EDE715503310B61D8A24357A945B188F3A254ABA25AC8365BB66E4EE8, cn=SANJAY DATTARAM MAHADESHWAR
Date: 2024.04.10 18:08:40 +05'30'

(संजय महाडेश्वर)

अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री, आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

७) आयुक्त, आरोग्य सेवा व कुटुंब कल्याण तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई -०१
८) विभागीय आयुक्त (सर्व)
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई
१०) उप महासंचालक, आधार (यु.आय.डी), टेलिफॉन एक्चेंज बिल्डींग, कफ परेड, मुंबई
११) अतिरीक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
१२) जिल्हाधिकारी (सर्व)
१३) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
१४) संचालक, वैद्यकिय शिक्षण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
१५) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
१६) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
१७) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
१८) नियंत्रक, शिधावाटप, मुंबई
१९) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
२०) सहसंचालक/उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
२१) जिल्हा पुरवठा अधिकारी, (सर्व)
२२) जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
२३) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालये (सर्व)
२४) सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२५) सर्व कार्यासने , सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२६) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, विधानभवन, मुंबई- २१
२७) भारतीय जनता पक्ष , महाराष्ट्र प्रदेश वसंतराव भगवान चौक, नरीमन पाईंट , मुंबई-२०
२८) शिवसेना, शुभ-दीप बंगलो, लँडमार्क सोसायटी, ठाणे.
२९) शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे), शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर मुंबई- २८
३०) इंडीयन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय)समिती टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई
३१) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पाईंट मुंबई- २१
३२) बहुजन समाज पक्ष, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१
३३) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई ४०० ००४
३४) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई -१३
३५) निवड नस्ती.